ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 02 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीची हक्काची!

# अर्ध्या महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट! मराठवाडा तहानलेला





पान 3 वरुन...
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमध्ये मनाई आदेश

## 'नीट' आंदोलनातील सर्व एफआयआर रद्द होणार..!

# आंदोलक विद्यार्थ्यांना 'सर्वोच्च' दिलासा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**NEET-UG पेपरफुटीप्रकरणी देशभरात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. २० ते २५ जुलैदरम्यान झालेल्या**



**आंदोलनांशी संबंधित विद्यार्थ्यांविरोधातील एफआयआर रद्द करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४२ अंतर्गत विशेष अधिकारांचा वापर करत न्यायालयाने हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे दिल्लीसह विविध राज्यांमध्ये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांपासून आंदोलक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.**

### 'संसद चलो' आंदोलनानंतर गुन्हे दाखल

'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) वतीने २० जुलै रोजी जंतरमंतर येथे 'संसद चलो' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. नीटच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी तसेच शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर हिंसाचाराच्या घटनांप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आंदोलनकर्ते विद्यार्थी आणि अन्य व्यक्तींविरोधात अनेक एफआयआर दाखल केले होते. तसंच, देशभरही आंदोलन पुकारण्यात आले होते. या विविध राज्यांमध्ये आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.



### ५ सप्टेंबरचा CJPचा मोर्चा रद्द

दरम्यान, गुन्हे मागे घेण्यासाठी केंद्राने पावलं उचलल्याने सीजेपीनेही ५ सप्टेंबर रोजी मोर्चा रद्द केला आहे. याबाबत सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी सर्वोच्च न्यायालयातच माहिती दिली. "कॉक्रोच जनता पार्टीचा सह-संयोजक म्हणून मी हे सांगू इच्छितो की, भारत सरकारचे सकारात्मक आश्वासन आणि आज त्यांना मिळालेली न्यायालयीन मंजुरी, तसेच या न्यायालयाकडून पास केला जाणारा आदेश लक्षात घेता, ५ सप्टेंबर रोजीच्या मोर्चाची हाक मागे घेणे CJP ला योग्य वाटते. तसेच आजच्या आदेशाचे पालन होईल अशी आशा पक्ष बाळगत आहे", असं सीजेपीचे सौरव दास यांनी भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाला सांगितलं.

NEET-UG पेपरफुटी आणि परीक्षेतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (CJP) वतीने २० जुलै रोजी दिल्लीत 'संसद चलो' आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान काही ठिकाणी पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट तसेच हिंसाचाराच्या घटना घडल्या. त्यानंतर दिल्लीसह बिहार, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये आंदोलकांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आले होते.

या प्रकरणी केंद्र सरकार आणि संबंधित राज्यांनी सर्वोच्च न्यायालयात एफआयआर रद्द करण्याची मागणी केली होती. केंद्राने २० ते २५ जुलैदरम्यानच्या आंदोलनांशी संबंधित प्रकरणांमध्ये पुढील कारवाई न करण्याची तसेच त्याच घटनांबाबत नव्याने एफआयआर दाखल न करण्याची भूमिका न्यायालयासमोर मांडली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने संबंधित एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले.

मात्र, गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना या निर्णयातून अपवाद ठेवण्यात आला आहे. जंतरमंतर आंदोलनाच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या २,८७३ व्यक्तींविरोधात गंभीर स्वरूपाच्या आरोपांबाबत दिल्ली पोलिसांना स्वतंत्रपणे कारवाई करण्याची मुभा न्यायालयाने दिली आहे. त्यामुळे शांततापूर्ण आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असला तरी गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवरील कारवाई सुरू राहणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर CJPने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये प्रस्तावित केलेला मोर्चा मागे घेतला आहे. केंद्र सरकारने एफआयआर मागे घेण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले असून न्यायालयाने त्याला कायदेशीर मंजुरी दिल्याने आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचे CJPचे सह-संयोजक सौरव दास यांनी न्यायालयाला सांगितले.

दरम्यान, NEET-UG परीक्षा रद्द झाल्यानंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्याच्या आश्वासनावरही केंद्र सरकारने भूमिका स्पष्ट केली आहे. भरपाईची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी केंद्राने तीन महिन्यांचा कालावधी मागितला असून, त्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

### जे.पी.नड्डा काय म्हणाले?


"विद्यार्थ्यांचं भविष्य लक्षात घेऊन केंद्र सरकारच्यावतीने आम्ही आश्वासन दिलं होतं की आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले जातील आणि भविष्यात त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई केली जाणार नाही. याच अनुषंगाने आम्ही भाजपाची सत्ता असलेल्या राज्यांमधील सरकारांशी चर्चा केली. त्यानंतर आता आम्ही ते आश्वासन पूर्ण करत आहोत. ५ सप्टेंबर रोजी नियोजित असलेलं आंदोलन मागे घेण्याचा निर्णय सीजेपीने पत्रकार परिषदेत जाहीर केला, त्या निर्णयाचं देखील आम्ही स्वागत करतो. तरुणांची प्रगती आणि विकास ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे", असं मंत्री जे.पी.नड्डा यांनी म्हटलं आहे.

# पुणे जिल्ह्यात ६२ लाख मतदार!

## एसआयआरनंतर २८ लाख ६६ हजार नावे वगळली; १३ लाख मतदारांची सुनावणी होणार

**महाईन्यूज । पुणे**

**मतदारयादीच्या विशेष सखोल पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली असून, जिल्ह्यात ६२ लाख १३ हजार ६९२ मतदारांची नोंदणी झाली आहे. तब्बल २८ लाख ६६ हजार ४८१ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. प्रारूप मतदारयादीतील मतदारांपैकी विसंगती आणि 'मॅपिंग' न झालेल्या १३ लाख ३२ हजार ४१८ मतदारांच्या सुनावण्या घेतल्या जाणार आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक मतदार हे भोसरी विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक चार लाख ६१ हजार ९३४ मतदारांची नोंदणी झाली आहे. सर्वात कमी मतदार शिवाजीनगर विधानसभा मतदार संघामध्ये एक लाख ६३ हजार २६१ झाले आहेत.**



जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत ही यादी प्रसिद्ध करण्यात आली. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. 'एसआयआर' मोहीम सुरू होण्यापूर्वी जिल्ह्यात ९० लाख ८० हजार १७३ मतदार होते. मात्र, त्यापैकी २८ लाख ६६ हजार ४८१ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. त्यामध्ये एक लाख ४३ हजार ९७५ दुबार, ३ लाख १२ हजार ४८ मयत, १७ लाख ८३ हजार ५८ अनुपस्थित, ५ लाख ९१ हजार ३८ स्थलांतरित आणि ३६ हजार ३६२ अन्य मतदार आहेत.

प्रारूप मतदारयादीतील ६२ लाख १३ हजार ६९२ मतदारांपैकी ३१ लाख ५१ हजार २९७ पुरुष, ३० लाख ६२ हजार १२ महिला आणि ३८३ तृतीयपंथी मतदार आहेत. प्रारूप मतदारयादीतील मतदारांपैकी ५ लाख ७७ हजार ८२१ मतदारांमध्ये विसंगती आणि ७ लाख ५४ हजार ५९७ मॅपिंग न झालेले असे १३ लाख ३२ हजार ४१८ मतदार आहेत. त्यांच्या सुनावण्या घेतल्या जाणार आहेत.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर आणि मावळ या दहा विधानसभा मतदारसंघांमध्ये शिरूरमध्ये सर्वाधिक तीन लाख ७२ हजार मतदार झाले आहेत. सर्वांत कमी दौंडमध्ये दोन लाख ६९ हजार मतदारांची नोंद झाली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीन मतदारसंघांमध्ये भोसरी मतदारसंघ हा जिह्यात आघाडीवर आहे. या मतदारसंघात चार लाख ६१ हजार मतदार झाले आहेत. पिंपरीत सर्वांत कमी दोन लाख ३६ हजार मतदारांची नोंदणी झाली आहे.

पुणे शहरातील दहा विधानसभा मतदारसंघांमध्ये हडपसर मतदारसंघ प्रथम स्थानी आहे. या मतदारसंघात तीन लाख ५३ हजार मतदारांनी नोंदणी केली आहे. सर्वांत कमी मतदार हे शिवाजीनगरमध्ये एक लाख ६३ हजार नोंदविले गेले आहेत.

प्रारूप मतदारयादीमध्ये समाविष्ट मतदारांच्या तपशिलात तफावत आढळल्यास; तसेच २००२ च्या मतदारयादीशी मॅपिंग झालेले नसलेल्या मतदारांसाठी संबंधित यादी भागाच्या सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनावणीनंतर संबंधित मतदाराचे नाव अंतिम मतदारयादीत समाविष्ट करायचे किंवा नाही, याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

### हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

प्रारूप मतदारयादीवर दावे आणि हरकती ३० सप्टेंबरपर्यंत करता येणार आहेत. या हरकतींवर २९ ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही केली जाणार आहे. अंतिम मतदारयादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीमध्ये नाव नसल्यास प्रपत्र क्रमांक ६ भरून नव्याने मतदार नोंदणी करता येणार आहे. तसेच यादी नावामध्ये आक्षेप असल्यास प्रपत्र क्रमांक ७ भरून आक्षेप नोंदविता येणार आहे. ईपीक कार्ड करिता प्रपत्र क्रमांक ८ भरता येणार आहे. मतदारयादीमध्ये दुरुस्ती देखील करून घेता येणार आहे.

### मतदान केंद्रांमध्ये वाढ

'एसआयआर'मुळे सात मतदार केंद्रे वाढली आहेत. आता जिल्ह्यात ८ हजार ४२४ मतदान केंद्रे झाली आहेत. त्यामध्ये जुन्नर ३५६, आंबेगाव ३४४, खेड-आळंदी ३९३, शिरूर ४५९, दौंड ३१५, इंदापूर ३३९, बारामती ३८८, पुरंदर ४१३, भोर ५६७, मावळ ४०२, चिंचवड ५६०, पिंपरी ३९७, भोसरी ४९१, वडगाव शेरी ४३८, शिवाजीनगर २६६, कोथरूड ३८७, खडकवासला ५०२, पर्वती ३४४, हडपसर ५२५, पुणे कॅन्टोन्मेंट २७०, कसबा पेठ २६८ मतदान केंद्रांचा समावेश असणार आहे.

# पुणे शिक्षक मतदार संघातून शिंदे सेनेकडून मंगेश चिवटे मैदानात

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शिक्षक विधानपरिषद मतदारसंघातून एकनाथ शिंदे शिवसेनेकडून उमेदवारी निवडणूक लढणार असल्याचे या पक्षाच्या वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत जाहीर केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पाठबळ असल्याने या मतदारसंघातील शिंदे सेनेचे मंत्री, खासदार ,आमदार, पदाधिकारी प्रचारात सक्रिय होत आहेत. रविवारी कोल्हापुरात प्रचाराचा नारळ फोडला जाणार असल्याचे चिवटे यांनी स्पष्ट केले.**



पुणे शिक्षक मतदारसंघातील निवडणूक अनेक प्रमुख उमेदवारांमुळे चर्चेत येऊ लागली आहे. नुकतेच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे यांना पुणे येथे एका मोठ्या शिक्षक संघटनेने पाठिंबा दर्शवला. तर आज एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेने मंगेश चिमटे यांना पाठिंबा दिला असल्याचे संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ यांनी येथे जाहीर केले. या संघटनेचे राज्यात २३ हजार शिक्षक सदस्य असून त्यापैकी पुणे मतदार संघात १५ हजार सदस्य असल्याचा दावा अडसूळ यांनी केला.

दरम्यान आपल्या उमेदवारी बाबत मंगेश चिवटे यांनी सांगितले की, एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना वैद्यकीय पक्षाचे काम अतिशय सक्षमपणे पार पाडले. माझे शिक्षण एम.ए. बीएड झाले असून बारामती येथे काही काळ अध्यापन केले आहे. शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यातील बरेच प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यामुळे येत्या १ एप्रिल पासून शाळांचा टप्पा वाढ अनुदान सुरू होणार आहे. तसेच, धर्मवीर आनंद दिघे शिक्षक आरोग्य कवच योजनेअंतर्गत शिक्षक व कुटुंबीयांवर मोफत उपचार होणार आहेत. या योजनेबाबत आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर सकारात्मक आहेत असे त्यांनी स्पष्ट केले.

रविवारी कोल्हापुरात आदर्श शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वितरण कार्यक्रम पालकमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार चंद्रदीप नरके, माजी खासदार संजय मंडलिक, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर यांच्या उपस्थित होणार आहे.

### चिवटे यांच्या हालचाली

मिरज येथील एका कार्यक्रमात शिवसेनेच्या आमदारांनी पुणे शिक्षक मतदारसंघ शिवसेनेच्या वाट्याला सोडून मंगेश चिवटे यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी महायुतीचे नेते तथा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे जाहीर केले आहे. मंगेश चिवटे यांनी मागील काही काळापासून पुणे शिक्षक मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत शिक्षकांचे मेळावे आणि गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर, आरोग्य संदर्भातील मागण्यांवर आणि विमा योजनांच्या संदर्भात त्यांनी पाठपुरावा केला असून, स्थानिक पातळीवर त्यांचा प्रचार सुरू आहे.

# वायसीएम कँटीनमध्ये 'भेसळी'चा संशय; FDAचा छापा

## चार खाद्यपदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत; १४ दिवसांत खुलासा करण्याचे आदेश

**महाईन्यूज** I पिंपरी-चिंचवड

**पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील कँटीनच्या कारभारावर अखेर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कारवाईचा बडगा उगारला आहे. अन्नपदार्थांचा दर्जा, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांच्या पालनाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर FDAच्या पथकाने कँटीनवर अचानक छापा टाकला. तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींनंतर भेसळीच्या संशयावरून चार खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या प्रकरणी कँटीन चालकाला १४ दिवसांची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे FDAकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

विशेष म्हणजे, संबंधित कँटीन चालकाचे शिवसेना शिंदे गटातील एका स्थानिक नेत्याशी निकटचे संबंध असल्याची चर्चा रुग्णालय परिसरात सुरू आहे. त्यामुळे FDAच्या कारवाईनंतर या राजकीय कनेक्शनचीही चर्चा रंगली आहे. मात्र, या संबंधाबाबत अधिकृत दुजोरा अद्याप समोर आलेला नाही.




### रुग्णालयातील कँटीन, पण तक्रारींचा ढीग

वायसीएम रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक येतात. त्यामुळे रुग्णालयातील कँटीनमधील अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. कँटीनमधील अन्नाबाबत निकृष्ट दर्जा आणि स्वच्छतेच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने FDAने ही तपासणी केली. तपासणीदरम्यान कँटीनमधील स्वच्छता आणि अन्न सुरक्षा मानकांच्या पालनाबाबत काही त्रुटी आढळल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर चार खाद्यपदार्थांचे नमुने घेण्यात आले. हे नमुने शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवालात नेमके काय समोर येते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### राजकीय 'वजन' असल्याने तक्रारींकडे दुर्लक्ष?

संबंधित कँटीन चालकाचे शिवसेना शिंदे गटातील स्थानिक नेत्याशी निकटचे संबंध असल्याची चर्चा असल्याने या राजकीय कनेक्शनमुळे कँटीनच्या कारभाराला संरक्षण मिळते का? असा सवालही उपस्थित केला जात आहे. तक्रारी वारंवार होत असताना FDAची कारवाई होण्यासाठी एवढा कालावधी का लागला? रुग्णालय प्रशासनाने यापूर्वी कँटीनची तपासणी केली होती का?



कँटीन चालकावर यापूर्वी कोणती कारवाई झाली होती का? तसेच कँटीनचा ठेका देताना अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या अटींची पूर्तता करण्यात आली होती का, असे अनेक प्रश्न आता पुढे आले आहेत. दरम्यान, FDAच्या प्रयोगशाळेच्या अहवालानंतरच अन्नपदार्थांमध्ये भेसळ झाली आहे की नाही, याचे अधिकृत चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई होते का आणि कँटीनच्या व्यवस्थापनावरही जबाबदारी निश्चित केली जाते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या कँटीनच्या कारभारात राजकीय हस्तक्षेपाला थारा मिळता कामा नये, अशी अपेक्षा रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांकडून व्यक्त होत आहे.

### 'पाणी'ही विकतच घ्यायचे?

FDAच्या कारवाईनंतर कँटीनच्या अन्य कारभारावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. कँटीनमध्ये ग्राहकांच्या टेबलवर पिण्यासाठी पाणी दिले जात नसल्याची तक्रार रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांनी केली आहे. विकतचे पाणी घेण्यासाठीच टेबलवर पाणी दिले जात नसल्याचा आरोप ग्राहकांकडून करण्यात येत आहे. याबाबत कँटीन चालकाकडून पाणी सांडल्यानंतर त्यावरून एक रुग्ण घसरून पडल्याची घटना घडली होती, त्यामुळे टेबलवर पाणी देणे टाळले जात असल्याचे कारण दिले जात असल्याची माहिती आहे. मात्र, रुग्णालयातील कँटीनमध्ये पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमध्ये मनाई आदेश

**महाईन्यूज** I पिंपरी-चिंचवड

**आगामी गणेशोत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७(१)(३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आला आहे. पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी हा आदेश निर्गमित केला आहे.**




हा आदेश २ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२.०१ वाजेपासून १५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत म्हणजेच १४ दिवस लागू राहणार आहे. आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी दाहक किंवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दांडे, शस्त्रे, सुरे, कोयते, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा वस्तू जवळ बाळगणे किंवा वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच व्यक्तींचे किंवा नेत्यांचे प्रतिकात्मक पुतळे, चित्रे अथवा प्रतिमा यांचे प्रदर्शन व दहन करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

मोठ्या आवाजात अवमानकारक घोषणा देणे, वाद्य वाजविण्यामुळे सभ्यता किंवा नैतिकतेस धोका निर्माण होईल असे कृत्य करणे, राज्याच्या सुरक्षिततेला धोका पोहोचेल किंवा राज्य उलथून टाकण्यास प्रवृत्त करणारी आक्षेपार्ह भाषणे करणे अथवा कोणतीही वस्तू तयार करून तिचा जनतेत प्रसार करणे, अशा कृत्यांनाही प्रतिबंध करण्यात आला आहे.

तसेच पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमविण्यास किंवा पोलीस आयुक्तांची पूर्वपरवानगी न घेता सभा अथवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय सेवेत कर्तव्य बजावण्यासाठी एकत्र येणाऱ्या व्यक्तींना या आदेशातून वगळण्यात आले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम १३५ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, असेही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत कळविण्यात आले आहे.

### पोलिसांची कडक नजर!

२ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरदरम्यान पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मनाई आदेश लागू राहणार आहे. शस्त्रे, दाहक व स्फोटक पदार्थ बाळगणे, पाच किंवा अधिक जणांचा जमाव करणे, तसेच पूर्वपरवानगीशिवाय सभा-मिरवणूक काढण्यास बंदी आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कलम १३५नुसार कारवाई होणार आहे.



## भूमिका

**दूध हे केवळ अन्नपदार्थ नाही, तर लाखो कुटुंबांच्या आरोग्याशी आणि हजारो पशुपालकांच्या उदरनिर्वाहाशी जोडलेले जीवनावश्यक उत्पादन आहे. त्यामुळे दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेले भेसळमुक्त दूध अभियान स्वागतार्ह आहे.**

# भेसळीला आळा, दुग्ध व्यवसायाला बळ



मात्र, धाडी, नमुने आणि कारवाईपुरते हे अभियान मर्यादित न राहता त्यातून कायमस्वरूपी गुणवत्ता नियंत्रणाची व्यवस्था उभी राहणे गरजेचे आहे.

भेसळयुक्त दूध आणि कृत्रिम दूध बाजारात येणे म्हणजे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ होय. त्यामुळे ग्राहकांना शुद्ध आणि सुरक्षित दूध मिळणे हा केवळ अपेक्षेचा विषय नसून त्यांचा अधिकार आहे. सध्या कडक तपासण्यांमुळे भेसळीला काही प्रमाणात आळा बसला असून, चांगल्या प्रतीच्या दुधाला मागणी आणि उत्पादकांना तुलनेने चांगला दर मिळताना दिसत आहे. या सकारात्मक बदलाचे रूपांतर दीर्घकालीन सुधारणेत करणे आवश्यक आहे.

दुधाचा दर्जा सुधारला तर त्याचा थेट फायदा पनीर, तूप, चीज, दही यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांनाही होईल. गुणवत्तेला बाजारभावाशी जोडले गेले तर पशुपालक चांगल्या जातीच्या गायी-म्हशी, संतुलित पशुखाद्य, वैरण, लसीकरण आणि आधुनिक पशुपालन पद्धतींमध्ये अधिक गुंतवणूक करतील. म्हणजेच भेसळविरोधी मोहिमेचा परिणाम केवळ ग्राहकांच्या ताटापर्यंत न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना देणारा ठरू शकतो.

यासाठी पशुसंवर्धन विभाग आणि अन्न व औषध प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. पशुधनाचे आरोग्य, दूध उत्पादन आणि दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता हे विषय परस्परांशी जोडलेले आहेत. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे कौशल्य केवळ उपचार आणि लसीकरणापुरते न ठेवता गुणवत्ता नियंत्रणाच्या कामातही प्रभावीपणे वापरता येईल. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा अधिक चांगला उपयोग होईल.

नमुना तपासणीची क्षमता वाढविणे हीदेखील तातडीची गरज आहे. प्रयोगशाळांची संख्या, आधुनिक उपकरणे आणि प्रशिक्षित मनुष्यबळ वाढल्याशिवाय मोठ्या राज्यातील प्रत्येक भागावर प्रभावी नजर ठेवणे कठीण आहे. पशुसंवर्धन विभागाच्या प्रयोगशाळांचा योग्य पद्धतीने वापर केल्यास तपासणीची क्षमता वाढू शकते.

शिवाय, भेसळविरोधी कारवाई केवळ दुधापुरती मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. अंडी, मांस आणि इतर प्राणिजन्य उत्पादनांमध्ये औषधे, प्रतिजैविके किंवा इतर घटकांच्या गैरवापरावरही लक्ष ठेवावे लागेल. ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण ही संपूर्ण साखळीची जबाबदारी आहे. म्हणूनच सध्याच्या अभियानाकडे तात्पुरती धडक कारवाई म्हणून नव्हे, तर दुग्ध व्यवसायाच्या पुनर्रचनेची संधी म्हणून पाहिले पाहिजे. प्रशासनाची इच्छाशक्ती, आधुनिक तपासणी व्यवस्था, पशुपालकांचे प्रबोधन आणि ग्राहकांची जागरूकता या चौघांचा मेळ जमला, तर 'शुद्ध दूध' ही जाहिरातीतील घोषणा न राहता महाराष्ट्राची ओळख बनू शकते. भेसळीला चाप आणि गुणवत्तेला प्रोत्साहन—हीच या अभियानाची खरी कसोटी ठरेल.

## प्रासंगिक »

# मुलीचे मोल

**एका गावात गणपत नावाचा शेतकरी राहत होता. त्याला दोन मुली होत्या. गावातील काही लोक त्याला म्हणायचे, "मुलगा असता तर म्हातारपणी आधार झाला असता." गणपत मात्र शांतपणे उत्तर द्यायचा, "माझ्या मुलीच माझी खरी ताकद आहेत."**

एकदा गणपत आजारी पडला. शेतातील कामे थांबण्याची वेळ आली. त्याच्या दोन्ही मुलींनी शिक्षण सांभाळत शेताची जबाबदारी घेतली. त्यांनी मेहनत करून पीक वाचवले. काही दिवसांनी गणपत बरा झाला.

गावातील त्याच लोकांनी गणपत-ला विचारले, "तुझ्या मुलींनी एवढे सगळे कसे केले?" गणपत हसून म्हणाला, "मु-लगा-मुलगी असा भेद आपण करतो; कष्ट, प्रेम आणि जबाबदारी यांना लिंग नसते."

काही वर्षांनी त्याच्या मोठ्या मुलीने गावात मुलींसाठी वाचनालय सुरू केले. धाकटीने महिलांना स्वावलंबी बनवण्या-साठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. गावातील अनेक कुटुंबांची विचारसरणी बदलली. त्या दिवशी ग्रामसभेत गणपत म्हणाला, "ज्या समाजाला मुलगी नको असते, तो समाज स्वतःचे भविष्य नाकारत असतो."

- तात्पर्य : मुलगा-मुलगी समान; भेदभाव नको.

'मातृभूमी : अ नेशन विदाऊट विमेन' हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा स्त्रीविरहित गावाचे चित्रण अतिशयोक्ती वाटले होते.

## गावात स्त्रीच उरणार नाही, या भयावह वास्तवाकडे वाटचाल?



मात्र, आज महाराष्ट्रातील काही भागांत उघडकीस आलेल्या गर्भलिंग निदान आणि बेकायदा गर्भपाताच्या घटनांनी त्या काल्पनिक कथानकाची भीतीदायक सावली वास्तवावर पडताना दिसत आहे. अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांत उघडकीस आलेले प्रकार केवळ काही व्यक्तींचे गुन्हे नसून समाजाच्या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत.

गर्भलिंग निदानावर कायद्याने बंदी असतानाही डॉक्टर, एजंट, औषध विक्रेते आणि अन्य घटकांच्या मदतीने हे रॅकेट सुरू राहणे गंभीर आहे. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे वैद्यकीय ज्ञान नसलेल्या व्यक्तींकडून गर्भपात करण्यात आल्याचे समोर येणे. अशा प्रकारांमध्ये संबंधित महिलेच्या जीवाला आणि आरोग्याला किती मोठा धोका निर्माण होतो, याचा विचारच अंगावर काटा आणणारा आहे.

मुलगा हवा, मुलगी नको, ही मानसिकता केवळ ग्रामीण किंवा अशिक्षित समाजापुरती मर्यादित नाही. शिक्षण आणि आर्थिक प्रगती झाली म्हणजे सामाजिक विचारसरणीही प्रगत झाली असे होत नाही. मुलीला ओझे मानणारी मानसिकता, हुंडा, वारसाहक्काबाबतचे पूर्वग्रह आणि सामाजिक दबाव यामुळे आजही अनेक कुटुंबे मुलीच्या जन्माकडे नकारात्मक दृष्टीने पाहतात.

लिंग गुणोत्तरात एखाद्या परिसरात अचानक मोठी तफावत दिसत असेल तर प्रशासनाने त्याची तातडीने दखल घेतली पाहिजे. गर्भवती महिलांची नोंद, त्यांचे आरोग्य आणि प्रसूतीपर्यंतचा मागोवा घेणारी यंत्रणा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कार्यरत असणे आवश्यक आहे. संबंधित विभागांमध्ये माहितीची देवाणघेवाण आणि नियमित तपासणी झाली तर अशा रॅकेटचा वेळीच पर्दाफाश होऊ शकतो.

ही समस्या केवळ कायद्याने संपणार नाही. कायद्याची कठोर अंमलबजावणी जितकी आवश्यक आहे, तितकीच समाजाच्या मानसिकतेत बदलाची गरज आहे. मुलगी जन्माला येणे ही समस्या नसून तिच्या जन्माला नकार देणारी मानसिकता ही खरी समस्या आहे. आज काही गावांतील ढासळते लिंग गुणोत्तर आपल्याला इशारा देत आहे. हा इशारा दुर्लक्षित केला, तर काल्पनिक चित्रपटातील स्त्रीविरहित गाव उद्याच्या वास्तवाचा चेहरा ठरू शकतो. त्यामुळे 'बेटी बचाओ' ही घोषणा न राहता प्रत्येक मुलीच्या जन्माचे संरक्षण करणारी सामाजिक चळवळ बनणे हीच काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



श्वान शीघ्रकोपी ।
आपणा घातकर पापी ॥१॥

नाहीं भीड आणि धीर ।
उपदेश न जिरे क्षीर ॥ध्रु. ॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी 35 हजार कोटी!

## रस्ते विकासासाठी सर्वाधिक ५१ टक्के निधी; कुंभानंतरही सुविधांचा फायदा

**महाईन्यूज । नाशिक**

**हिंदू धर्मीयांच्या आस्थेशी जोडलेल्या कुंभमेळ्याने गतवर्षी प्रयागराज येथे गर्दीचा नवा उच्चांक प्रस्थापित केला. आता २०२७ मधील नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा खर्चाच्या दृष्टीने नव्या विक्रमाची नोंद करणार आहे. मागील १२ वर्षांत देशात झालेल्या सहा कुंभमेळ्यांवर झालेल्या खर्चापेक्षा कित्येक पट अधिक खर्च यावेळी होणार आहे. तब्बल ३५ हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांनी हा कुंभमेळा भारलेला असणार आहे. यात सर्वाधिक ५१ टक्के निधी रस्ते बांधणीवर, तर इमारती आणि संस्थात्मक पायाभूत सुविधांसाठी नऊ टक्के आणि पूल, उड्डाण पुलांसाठी आठ टक्के खर्च होणार आहे.**



### नाशिक महापालिकेवर कर्जभार

आर्थिक क्षमतेचे कारण देत २०१५ मधील कुंभमेळ्यासाठी निधीची व्यवस्था करण्यास नाशिक महापालिकेने असमर्थता दर्शविली होती. त्यामुळे राज्य सरकारने महापालिकेचाही आर्थिक भार उचलला होता. आगामी कुंभमेळ्यासाठी नाशिक महापालिकेने दोन-तीन वर्षे आधीपासूनच तयारी सुरू केली. २०२४-२५ या आर्थिक वर्षात २२५ कोटी आणि २०२५-२६ या वर्षात २०० कोटी रुपये, अशी एकूण ४२५ कोटी रुपयांची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली. या काळात ४०६ कोटी रुपयांच्या ठेवी मोडण्यात आल्या. गोदावरी स्वच्छतेसाठी स्वच्छ गोदावरी आणि पाणीपुरवठा योजनेच्या विस्तारासाठी हरित म्युनिसिपल बाँडद्वारे ४०० कोटी रुपये उभारण्यात आले. खासगी-भागीदारी तत्त्वावरील ४४९ कोटी रुपयांच्या मलनिस्सारण प्रकल्पामुळे ८५० कोटी रुपयांचा कर्जभार वाढला. कुंभमेळ्यासाठी सुमारे १,२०० ते १,२५० कोटी रुपये स्वनिधी महापालिकेने उभारल्याचे सांगितले जाते.

२०२५ मध्ये प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभात गर्दीचे आजवरचे सर्व विक्रम मोडीत निघाले. अपेक्षेपेक्षा पाचपट भाविक या कुंभमेळ्यात सहभागी झाले. २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील कुंभमेळा होत असून, त्यात १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. त्याआधारे नियोजन आणि जय्यत तयारी सुरू आहे. त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकार तसेच नाशिक महापालिकेकडून तब्बल ३५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. धार्मिक परंपरा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधत नाशिक-त्र्यंबकेश्वरला देशाची प्रमुख आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याची तयारी कुंभमेळा प्राधिकरणाने केली आहे.

कुंभमेळ्यात साधू-महंतांसह भाविकांची संख्या कोट्यवधींच्या घरात पोहोचते. त्यामुळे सोयी-सुविधांसाठी सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतंत्र आर्थिक नियोजन करावे लागते. या संदर्भातील देशातील आकडेवारी प्रशासनाने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ चा आराखडा तयार करताना मांडली होती. त्यानुसार, २०१३ ते २०२५ या कालावधीत देशात सहा कुंभमेळे झाले. २०१३ मधील प्रयागराज कुंभमेळ्यासाठी शासनाने १,१४२ कोटी रुपये, नाशिक-त्र्यंबकेश्वर (२०१५) २,३७९ कोटी, उज्जैन (२०१६) २,८१० कोटी, प्रयागराज (अर्धकुंभ, २०१९) ३,६०० कोटी रुपयांहून अधिक, हरिद्वार (२०२१) १०५० कोटी आणि प्रयागराज (२०२५) कुंभमेळ्यासाठी ७,३०३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला होता.

पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकरणाने २२,४२५.३९ कोटी रुपयांच्या योजनांना मान्यता दिली आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २,२७०.६० कोटी रुपये, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकासासाठी (एमएसआयडीसी) २७५ कोटी, महापारेषण ९४६.८१ कोटी आणि नाशिक जिल्हा परिषदेच्या ३५.०८ कोटींच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून ८,७६१ कोटी ५४ लाख रुपयांची कामे केली जात आहेत. त्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची २,७६३.२४ कोटी, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाची ४,३५५.९२ कोटी, रेल्वे १,३२९.२४ कोटी, रामकाल पथासाठी (महापालिका) ९९.१४ कोटी रुपये आणि एमएसआयडीसीच्या (द्वारका चौक) २१४ कोटी रुपयांच्या कामांचा अंतर्भाव आहे. कुंभमेळा आराखड्यात आतापर्यंत ३४ हजार ७३२.४२ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश झाला आहे.

# पीओपी मूर्तींच्या विसर्जनाचा तिढा तूर्त सुटला; गतवर्षीचे नियमच यंदाही कायम

**महाईन्यूज । मुंबई**

**प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तींच्या विसर्जनावरून निर्माण झालेला संभ्रम तूर्तास दूर झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालापर्यंत गेल्या वर्षीचेच नियम लागू राहणार असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत, तर सहा फुटांपेक्षा उंच मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतांत करता येणार आहे. पर्यावरण विभागाने मंगळवारी याबाबत परिपत्रक काढत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.**



गेल्या वर्षी म्हणजे, १ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत होती. मात्र उच्च न्यायालयाच्या १४ आणि २० ऑगस्टच्या आदेशांनंतर त्या सूचनाच अंतिम निकालापर्यंत लागू राहतील, असे राज्य सरकारने आता स्पष्ट केले आहे.

पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत रोहित जोशी व इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर उच्च न्यायालयात गेल्या काही आठवड्यांपासून सुनावणी सुरू होती. १४ ऑगस्ट रोजी युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला. त्या वेळी अंतिम निर्णय होईपर्यंत न्यायालयाच्या परवानगीशिवाय पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करता येणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तोंडावर मंडळे, मूर्तिकार आणि प्रशासनापुढे विसर्जनाचा प्रश्न निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने न्यायालयाकडे यंदाच्या गणेशोत्सवासाठी नियम स्पष्ट करण्याची विनंती केली. त्यानंतर २० ऑगस्ट रोजी उच्च न्यायालयाने गतवर्षीचा २४ जुलै २०२५ चा आदेश अंतिम निकाल होईपर्यंत लागू राहील, असे स्पष्ट केले. त्यानुसार सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्ती कृत्रिम जलसाठ्यांमध्ये, तर त्यापेक्षा उंच मूर्ती नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जित करता येणार आहेत.

गेल्या काही दिवसांपासून बदलत असलेल्या नियमांबाबतचा संभ्रम दूर झाला असला तरी पीओपी मूर्तींच्या भवितव्याचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. पर्यावरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर न्यायालयाचा अंतिम निकाल काय येतो, याकडे आता लक्ष लागले आहे.

# पाकिस्तानचं हास्यास्पद कृत्य!

## SCO परिषदेतील सामूहिक फोटोतून पंतप्रधान मोदींचा फोटो वगळला

**महाईन्यूज | बिश्केक**

**किर्गिझस्तानची राजधानी बिश्केक या ठिकाणी शांघाय सहकार्य संघटनेची (SCO) शिखर परिषद पार पडली आहे. या एससीओ शिखर परिषदेला रशिया, चीन, भारत, पाकिस्तानसह आदी देशांचे पंतप्रधान आणि अध्यक्ष उपस्थित होते. या परिषदेदरम्यान विविध जागतिक मुद्यांवर चर्चा पार पडली आहे. या बरोबरच अनेक देशांच्या नेत्यांशी द्विपक्षीय चर्चाही झाल्या आहेत.**



या एससीओ शिखर परिषदेनंतर सर्व देशांच्या नेत्यांचं एकत्रितरित्या फोटोसेशन पार पडलं. या फोटोसेशनमधील फोटोही समोर आले आहेत. मात्र, पाकिस्तानने केलेल्या एका हास्यास्पद कृतीची मोठी चर्चा रंगली आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या कार्यालयाकडून एससीओ शिखर परिषदेतील फोटो एक्सवर शेअर करण्यात आले आहेत. मात्र, या फोटोमधून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो वगळण्यात आला आहे.

पाकिस्तानने आपल्या नेहमीच्या स्वभावाला साजेसं असं वर्तन पुन्हा एकदा केल्याचं यावरून दिसून येत आहे. पाकिस्तानी पंतप्रधानांच्या कार्यालयाच्या एक्स (ट्विटर) हँडलवर एक 'क्रॉप' केलेला फोटो शेअर करण्यात आला आहे. हा फोटो एससीओ शिखर परिषदेतील असून या फोटोमधून पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो वगळण्यात आला आहे.

पाकिस्तानी पंतप्रधानांच्या कार्यालयाकडून शेअर करण्यात आलेल्या फोटोत एससीओ शिखर परिषदेला उपस्थित असलेल्या सर्व राष्ट्रप्रमुखांचा समावेश नाही. त्यामुळे यावरून पाकिस्तानचं खरं रूप पुन्हा एकदा जगासमोर आलं आहे. पाकिस्तानच्या या हास्यास्पद कृतीनंतर अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत.

एससीओ शिखर परिषदेमध्ये सर्व देशांच्या नेत्यांनी फोटोसेशन केलं. या फोटो सेशननंतर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे पुढे निघून जाताना व्हिडीओत दिसत आहेत, तर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ हे पाठिमागून घाई-घाईने जाऊन व्लादिमीर पुतिन यांचा हात धरत त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करत त्यांच्याशी संवाद साधताना दिसत आहेत. त्यानंतर शाहबाज शरीफ आणि व्लादिमीर पुतिन हे दोघे काही क्षण एकत्र उभे राहिले आणि त्यांनी थोडक्यात संवाद साधला. त्यानंतर ते दोघेही पुढे निघून जाताना व्हिडीओत दिसून आले. एससीओ शिखर परिषदेमधील पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या या कृतीचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.

### भारताने शेअर केला पूर्ण फोटो

एससीओ शिखर परिषदेनंतर सर्व देशांच्या नेत्यांचं एकत्रितरित्या फोटोसेशन पार पडलं. या फोटोसेशनमधील फोटो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स (ट्विटर) हँडलवर शेअर केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एससीओ शिखर परिषदेला उपस्थित असलेल्या सर्व राष्ट्रप्रमुखांचा समावेश असलेला फोटो शेअर केला आहे.

# पूरबळींचा आकडा ९३९; बेपत्ता ४,२४७ जणांचा शोध घेण्याचे आव्हान

**महाईन्यूज | नेपाळ**

**नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या पुरामधील मृतांची संख्या ९३९ इतकी झाली असून अजूनही चार हजारांपेक्षा जास्त लोक बेपत्ता आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. बेपत्ता स्थानिक आणि परदेशी नागरिकांचा शोध सुरू असून सातत्याने मृतदेह हाती लागत असल्यामुळे मृतांचा आकडा वाढत आहे.**



नेपाळच्या 'नॅशनल डिझास्टर रिस्क रिडक्शन अँड मॅनेजमेंट ऑथॉरिटी'ने (एनडीआरआरएमए) दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत चितवन जिल्ह्यातून २७९, नवलपारसी पूर्वमधून २१६, नवलपारसी पश्चिममधून १६८, गोरखा जिल्ह्यातून ६५ मृतदेह सापडले आहेत. त्याबरोबरच नुवाकोट जिल्ह्यत ९५, धडिंगमध्ये ५५, तनाहूमध्ये ३८ आणि रसुवा जिल्ह्यत २३ मृतदेह हाती लागले. एकूण ४,२४७ लोक बेपत्ता असून त्यामध्ये ९९ सुरक्षा सैनिकांचा समावेश आहे.

नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाने माहिती दिली की, ३९ देशांतील ५९१ नागरिक बेपत्ता आहेत. यामध्ये भारत, अमेरिका, चीन, रशिया, ब्रिटन, स्पेन, बेल्जियम, जर्मनी, इटली, माल्टा, तुर्की, स्वित्झर्लंड आणि पोर्तुगाल या देशांचा समावेश असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पूरग्रस्त भागांमधून आतापर्यंत १० हजारांपेक्षा जास्त लोकांची सुटका करण्यात यश आले असून त्यामध्ये ३२३ परदेशी नागरिकांचा समावेश आहे.

नेपाळ आणि तिबेटला जोडणारी भोटेकोशी मार्गिका, तसेच रसुवागाधी येथे सीमा जोडणारा भाग वाहून गेला आहे. दरम्यान, नेपाळला पुरेशी सामग्री नसल्याचा फटका बसत आहे. अडकलेल्यांना वाचवताना आणि मृतदेह बाहेर काढताना सुरक्षा सैनिकांना प्राणाची बाजी लावावी लागत आहे.

त्रिशूली नदीच्या खोऱ्यात पूराचे पाणी वेगाने वाढत असल्याची माहिती मिळताच त्रिभुवन त्रिशूली माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र दवाडी यांनी काही मिनिटांत शाळा रिकामी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ९०० हून अधिक विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षित उंच ठिकाणी हलविले. विद्यार्थी सुरक्षित ठिकाणी पोहोचताच काही क्षणांत शाळेची तीन मजली इमारत पाणी, चिखल, मोठे दगड आणि ढिगाऱ्याच्या वेगवान प्रवाहात वाहून गेली. घटना घडली त्या सकाळी शाळेत वर्ग सुरू झाले होते. दवाडी स्वत: एका वर्गात होते. त्यांना पुराचे पाणी वेगाने वाढत असल्याची माहिती मिळाल्यांतर त्यांनी वेगाने हालचाली केल्या. दरम्यान, दोन कर्मचारी अद्याप बेपत्ता आहेत.


### महाराष्ट्रातील ६७ पर्यटक बेपत्ताच

नेपाळमध्ये महाराष्ट्रातील ४०५ पर्यटक अडकले असून त्यापैकी ६७ नागरिक बेपत्ता आहेत. पुरामध्ये अडकलेल्या २६२ जणांना मायदेशी आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तर उर्वरित ७६ संपर्कात आहेत. संपर्क न झालेल्या पर्यटकांच्या शोधासाठी केंद्र सरकारचे विशेष पथक काठमांडू येथे दाखल झाले आहे.



# कतरिना ट्रोल!

अभिनेत्री कतरिना कैफने गेल्या वर्षी आई झाली. मुलगा विहानला जन्म दिल्यानंतर ती लाईमलाईटपासून दूर आहे. प्रेग्नन्सीनंतर ती कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात उपस्थित राहत नाही. मात्र अलिकडेच ती कुकू कोहली यांच्या निधनानंतर आयोजित करण्यात आलेल्या प्रार्थना सभेला हजर राहिली होती. त्यावेळी कतरिनासह ही तिचा पती, अभिनेता विकी कौशल आणि तिचे सासरेही उपस्थित होते. यावेळी कतरिनाचा लुक पाहून अनेकांनी तिला ट्रोल करण्यास सुरूवात केली आहे. सोशल मीडियावर तिचे व्हिडिओ आणि फोटो समोर आल्यानंतर काही ट्रोलर्सनी तिच्या बदललेल्या लुकवरून असंवेदनशील तसेच कमेंट्स केल्या. कतरिनाने यावर अद्याप प्रतिक्रिया दिली नाही, मात्र कतरिनाला ट्रोल करताच टीव्ही अभिनेत्री शिवालिका ओबेरॉय हिने टीका करणाऱ्यांना चांगलेच सुनावले आहे.



# जुन्या सिनेमाच्या रिमेकमध्ये जॅकलीन!

बॉलिवूडची अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस अलिकडेच 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात दिसून आली होती. आता जॅकलीनला आणखी एक चित्रपट मिळाला आहे. जॅकलीन आता 60 च्या दशकातील एका कल्ट हॉरर थ्रिलरच्या अधिकृत रिमेकमध्ये मुख्य भूमिकेत असणार आहे. 1964 मध्ये प्रदर्शित आणि राज खोंसला दिग्दर्शित चित्रपट 'वो कौन थी'चा हा रिमेक असणार आहे. 'वो कौन थी' एक मिस्ट्री थ्रिलरपट होता, ज्यात मनोज कुमार, प्रेम चोप्रा आणि हेलन महत्त्वाच्या भूमिकेत होत्या. जॅकलीन आता याच्या रिमेकमध्ये दिसून येणार आहे. चित्रपटाची कहाणी उत्तर भारतातील एका छोट्या शहराच्या पार्श्वभूमीवर आधारित असेल. ख्याति मदानच्या प्रॉडक्शन अंतर्गत निर्माण होणाऱ्या या चित्रपटात जॅकलीन नोकरदार महिलेच्या भूमिकेत असेल. ही महिला स्वत:च्या आसपास घडणाऱ्या असामान्य घटनांमध्ये अडकून पडते. चित्रपटात ती ॲक्शनही करताना दिसून येणार आहे. या चित्रपटात जॅकलीनसोबत दाक्षिणात्य अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन देखील दिसून येऊ शकतो. परंतु अद्याप याची पुष्टी होऊ शकलेली नाही. पृथ्वीराज यापूर्वी अनेक हिंदी चित्रपटांमध्ये दिसून आला आहे. मूळचा मल्याळी अभिनेता असलेल्या पृथ्वीराजचा आता देशभरात चाहतावर्ग निर्माण झालेला आहे.

# अन्नू कपूर यांच्या वक्तव्याने नवा वाद!

बॉलिवूडमधील ज्येष्ठ आणि बहुआयामी अभिनेते अन्नू कपूर हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि रोखठोक मतांसाठी कायम चर्चेत असतात. यासोबतच त्यांनी केलेली वक्तव्य वादात सापडत असतात. आता पुन्हा एकदा त्यांचे वक्तव्य वादात सापडले आहे.

यापूर्वी अभिनेते अन्नू कपूर यांनी अभिनेत्री तमन्ना भाटिया हिच्याविषयी बोलताना आक्षेपार्ह विधान केले होते. ज्यामुळे मोठा वादा निर्माण झाला होता. वाढत्या वादानंतर अभिनेत्याने दिलगिरी व्यक्त केली होती. अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत अभिनेत्याला रणबीर कपूर, सिद्धार्थ मल्होत्रा आणि रणवीर सिंग यांच्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता.

या प्रश्नाच्या उत्तरामुळे अन्नू कपूर यांना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात ट्रोल केले जात आहे. अन्नू कपूर यांनी रणबीर कपूर, रणवीर सिंग आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांसारख्या आजच्या आघाडीच्या कलाकारांविषयी आपल्याला फारशी माहिती नसल्याचे म्हटले. एवढेच नव्हे तर, आपण या कलाकारांचे चित्रपट पाहिले नसल्याचेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

भानू पाठक यांच्या यूट्यूब चॅनलवरील एका मुलाखतीदरम्यान अन्नू कपूर यांना रणबीर कपूर, रणवीर सिंग आणि सिद्धार्थ



मल्होत्रा यांच्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली. आपण या कलाकारांना वैयक्तिकरित्या ओळखत नाही, तसेच त्यांचे चेहरेही ओळखू शकत नसल्याचे ते म्हणाले.

त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, हे कलाकार आपल्यासमोर उभे राहिले तरी आपल्याला ते कोण आहेत, हे कदाचित ओळखता येणार नाही. रणबीर कपूरबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, दिवंगत अभिनेते ऋषी कपूर यांचा मुलगा म्हणूनच आपल्याला रणबीरचे नाव माहीत आहे. मात्र, त्याच्या कामाबद्दल किंवा चित्रपटांबद्दल आपल्याला विशेष माहिती नाही. अन्नू कपूर यांच्या या विधानावरून मोठा गदारोळ निर्माण झाला असून सोशल मीडियावर नेटकरी त्यांना खडेबोल सुनावत आहेत.

अन्नू कपूर यांच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाल्यास त्यांनी अंताक्षरी, जॉली एलएलबी २, विकी डोनर, ड्रिम गर्ल, हमारे बारह, सात खून माफ यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये लक्ष वेधक भूमिका साकारली आहे. अनेक दशकांच्या कारकिर्दीनंतरही ते सातत्याने वेगवेगळ्या भूमिका साकारत प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहेत.

# पाकिस्तान क्रिकेटला आणखी एक धक्का

## मिसबाह-उल-हकने तडकाफडकी दिला निवड समिती सदस्यपदाचा राजीनामा

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत दारुण पराभवानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डात (PCB) पुन्हा एकदा मोठा प्रशासकीय भूकंप झाला आहे. कसोटी संघ आणि कोचिंग स्टाफमध्ये तडकाफडकी मोठे बदल करण्यात आल्यानंतर, माजी कर्णधार मिसबाह-उल-हक याने पीसीबीच्या राष्ट्रीय निवड समिती सदस्यपदाचा राजीनामा दिला आहे.**



मिसबाह राष्ट्रीय निवड समितीत असूनही संघ आणि प्रशिक्षकांमधील या मोठ्या बदलांबाबत त्याच्याशी कोणतीही चर्चा केली गेली नाही, अशी माहिती समोर येत आहे. यामुळेच नाराज होऊन त्याने राजीनामा दिल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

एजबॅस्टन येथे ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या तिसऱ्या कसोटीपूर्वी पीसीबीने तब्बल ७ खेळाडूंना संघातून मुक्त केले आहे. यामध्ये मोहम्मद रिझवान, इमाम-उल-हक, सलमान अली आगा, अली उस्मान, आमीर जमाल, उवैस जफर आणि खुर्रम शहजाद यांचा समावेश आहे. याशिवाय सरफराज अहमद (मुख्य प्रशिक्षक) आणि उमर गुल (गोलंदाजी प्रशिक्षक) यांनाही पदावरून हटवण्यात आले आहे. त्यांच्या जागी मायक हेसन आणि अ‍ॅशली नोफ्के यांच्याकडे उर्वरित दौऱ्याची जबाबदारी देण्यात आली आहे.यासोबतच मिसबाहने लाहोर येथील 'नॅशनल क्रिकेट अकादमी'च्या फलंदाजी सल्लागार पदावरूनही पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे.

तिसऱ्या कसोटीसाठी पाकिस्तान संघात ५ अननुभवी खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. अरफत मिन्हास, मोहम्मद इम्रान ज्युनियर, साद बेग, मोहम्मद इम्रान रंधावा आणि रझाउल्लाह यांचा संघात समावेश झाला आहे. याशिवाय सॅम अयुब आणि अब्दुल्ला फझल यांनाही संधी मिळाली आहे.तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत इंग्लंडने पहिले दोन सामने जिंकून २-० अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या कसोटीत डावाने आणि दुसऱ्या कसोटीत १९४ धावांनी झालेला पराभव यामुळे पाकिस्तानवर ३-० अशा व्हाईटवॉशचे सावट आहे.

### मिसबाह २०१९ मध्ये होता मुख्य प्रशिक्षक

मिसबाहची मार्च महिन्यात आकिब जावेद, सरफराज अहमद आणि असद शफिक यांच्यासोबत चार सदस्यीय निवड समितीत नियुक्ती झाली होती. याआधी २०१९ मध्ये तो मुख्य प्रशिक्षक आणि मुख्य निवडकर्ता होता. आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा (WTC) २०२५-२७ च्या गुणतालिकेत पाकिस्तानचा संघ सध्या तळाला आहे.

### मिसबाह-उल-हकने दिला राजीनामा

'जिओ न्यूज'च्या माहितीनुसार, मिसबाहने आपल्या निर्णयाबाबत पीसीबीला कळवले असून तो सध्या नोटीस कालावधी पूर्ण करत आहे. 'क्रिकइन्फो'ने दिलेल्या वृत्तानुसार मिसबाहने राजीनामा सादर केला असला, तरी पीसीबीने तो अद्याप अधिकृतपणे स्वीकारलेला नाही.लॉर्ड्स कसोटीत इंग्लंडकडून तब्बल १९४ धावांनी पराभूत झाल्यानंतर पीसीबीने संघ आणि प्रशिक्षकांमध्ये मोठे फेरबदल केले. या निर्णयाच्या दुसऱ्याच दिवशी मिसबाहने हे पाऊल उचलले आहे.

# इशान किशन रचणार इतिहास; १००० धावांच्या विक्रमासाठी अवघ्या १४ धावांची गरज

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेट संघ १३ सप्टेंबरपासून दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर अफगाणिस्तानविरुद्ध ३ सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली असून, संघाचे कर्णधारपद पुन्हा एकदा श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आले आहे. संघात वैभव सूर्यवंशीला पुन्हा स्थान मिळाले.**



संजू सॅमसनचे पुनरागमन झाले आहे. संजू सॅमसनसह इशान किशनचीही यष्टीरक्षक म्हणून संघात निवड करण्यात आली आहे.

इशान किशन सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेत मोठी कामगिरी करण्यासाठी सज्ज आहे. २०२६ या वर्षात त्याने फलंदाजीत सातत्य राखले असून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या स्थानावर आहे. त्याच्या पुढे केवळ इंग्लंडचा हॅरी ब्रूक असून त्याने यंदा १२०० हून अधिक धावा केल्या आहेत. आता २०२६ मध्ये हॅरी ब्रूकनंतर १००० धावांचा टप्पा ओलांडणारा दुसरा फलंदाज बनण्याच्या उंबरठ्यावर इशान उभा आहे.

अफगाणिस्तानविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात अवघ्या १४ धावा करताच इशान आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०२६ या कॅलेंडर वर्षात १००० धावा पूर्ण करेल. एका कॅलेंडर वर्षात १००० धावा करण्याचा विक्रम तो पहिल्यांदाच करणार आहे; यापूर्वी २०२२ मध्ये ८९३ धावा ही त्याची सर्वोत्तम कामगिरी होती. इशानच्या या दमदार कामगिरीमुळे आगामी मालिकेत त्याच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा आहे. १००० धावांचा टप्पा गाठून इशानला २०२६ हे वर्ष आपल्या कारकिर्दीतील खास वर्ष ठरवण्याची संधी आहे.

### इशान किशन २०२६ मधील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज

इशान किशन २०२६ या वर्षात तिन्ही फॉरमॅट मिळून सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने यंदा २८ सामन्यांतील २७ डावांमध्ये ३६.५१ च्या सरासरीने ९८६ धावा फटकावल्या आहेत. यामध्ये त्याच्या नावावर २ शतके आणि १४ अर्धशतके नोंदवली गेली आहेत. या यादीत अन्य कोणताही भारतीय फलंदाज त्याच्या जवळपासही नाही. शुभमन गिल २०२६ मध्ये सर्वाधिक धावा करणारा दुसरा भारतीय फलंदाज आहे. त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे २०२६ मध्ये इशान किशनने भारतीय फलंदाजीमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आगामी सामन्यांमध्येही हीच लय कायम ठेवत त्याला आणखी मोठ्या धावसंख्येची अपेक्षा आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
दि. 02 सप्टेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

PCET- NUTAN
NMIET
Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology
Autonomous Institute | SPPU Affiliated
DTE CODE 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

Microsoft, Robots India
यांच्या संयुक्त विद्यमाने

# AI शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम

Elevate for Educators

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी आयोजित तालुकास्तरीय AI शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमास आपली उपस्थिती अपेक्षित आहे.




दि. ०१ ते ०४ सप्टेंबर 2026
स्थळ : नूतन महाराष्ट्र इंजिनिअरिंग कॉलेज, तळेगाव दाभाडे
A बिल्डिंग | ४ था मजला | ऑडिटोरियम हॉल

चला, शिक्षणात AI चा प्रभावी वापर शिकूया आणि अध्यापनाला नव्या तंत्रज्ञानाची जोड देऊया!

# चिंचवडची अन्वी बुद्धिबळाच्या जागतिक पटावर

## अल्पवयात WCM किताब, जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानाचा बहुमान; विश्वविजेतेपदाचे ध्येय

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**वय अवघे नऊ वर्षे... हातात बुद्धिबळाचे मोहरे आणि डोळ्यांसमोर भारतासाठी जागतिक स्तरावर सर्वोच्च स्थान मिळवण्याचे स्वप्न! चिंचवड येथील युवा बुद्धिबळपटू अन्वी दिपक हिंगे हिने अत्यंत कमी वयात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत पिंपरी-चिंचवड शहरासह महाराष्ट्र आणि देशाचे नाव उज्ज्वल केले आहे.**



अन्वीने Woman Candidate Master (WCM) हा प्रतिष्ठेचा किताब प्राप्त केला असून FIDE Girls Under-9 रेटिंगमध्ये जागतिक क्रमवारीत प्रथम स्थान मिळवण्याचाही बहुमान तिने संपादन केला आहे. World Cadet & Youth Rapid Chess Championship (Girls U8) स्पर्धेत उपविजेतेपद पटकावत तिने जागतिक स्तरावर आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली. अवघ्या नऊ वर्षांच्या वयात भारतासाठी तिने आतापर्यंत तब्बल १३ आंतरराष्ट्रीय पदके जिंकली आहेत.

ग्रीस, ताजिकिस्तान, मलेशिया आणि थायलंडसह विविध देशांमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धांमध्ये अन्वीने भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य U-9 मुलींच्या अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्येही तिने विजेतेपद पटकावले. यापूर्वी महाराष्ट्र राज्य U-7 मुलींच्या गटातही ती विजेती ठरली असून राष्ट्रीय स्तरावरदेखील तिने पदके मिळवली आहेत.

अन्वीच्या या असामान्य कामगिरीची दखल राज्यस्तरावरही घेण्यात आली असून मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला आहे. विविध राष्ट्रीय व प्रादेशिक माध्यमांनीही तिच्या यशस्वी वाटचालीची दखल घेतली आहे.

अन्वी सध्या Elpro International School, Chinchwad येथे शिक्षण घेत आहे. अभ्यास आणि बुद्धिबळाचा उत्तम समतोल साधत ती ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे आणि फिडे मास्टर सिद्धांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित प्रशिक्षण घेत आहे. भारताचे प्रतिनिधित्व करून जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त करण्याचे तिचे ध्येय असून त्यासाठी ती सातत्याने मेहनत घेत आहे.

यावेळी अन्वीचे आई वडील आरती दिपक हिंगे, दिपक जगन्नाथ हिंगे आणि सामाजिक कार्यकर्त्या शलाका कोंडावार उपस्थित होते.

> आज महापौर कार्यालयात अन्वीच्या आजवरच्या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले तसेच आगामी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या. "अवघ्या नऊ वर्षांच्या वयात अन्वीने आपल्या बुद्धिमत्ता, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर जागतिक स्तरावर पिंपरी-चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. आपल्या शहरातील अशा गुणवंत खेळाडूंचे यश हे संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. आज तिच्या डोळ्यांत भारतासाठी विश्वविजेतेपद मिळवण्याचे स्वप्न आहे. तिची ही जिद्द शहरातील हजारो मुला-मुलींना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देईल. अन्वीने भविष्यात जागतिक बुद्धिबळाच्या पटावर विक्रम नोंदवून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवावा.
>
> - रवि लांडगे, महापौर.

# STP शुल्काच्या प्रस्तावाला सोसायटी फेडरेशनचा तीव्र विरोध

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या दि. २ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावरील विषय क्रमांक ४ मधील STP व जलनिःस्सारण जोडणी शुल्काच्या प्रस्तावाला चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने तीव्र विरोध दर्शविला आहे. नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणारा हा प्रस्ताव सध्याच्या स्वरूपात मंजूर करू नये, अशी मागणी फेडरेशनने केली आहे.**




STP कार्यरत ठेवणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर वाढविणे या पर्यावरणपूरक उद्दिष्टांना फेडरेशनचा विरोध नसून, या उद्दिष्टांच्या नावाखाली सोसायटीधारकांवर अतिरिक्त व दुहेरी शुल्काचा भार टाकण्यास विरोध असल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

प्रस्तावातील दोन वेगवेगळ्या तक्त्यांमध्ये निवासी वापरासाठी ₹५०० प्रति गाळा शुल्काचा उल्लेख असून, त्यासोबत ₹१० हजार प्रति जलनिःस्सारण जोडणी शुल्क प्रस्तावित आहे. त्यामुळे एकाच प्रक्रियेसाठी दुहेरी शुल्क आकारले जाणार आहे का, असा सवाल फेडरेशनने उपस्थित केला आहे. तसेच प्रस्तावानुसार विकासकाने शुल्क भरणे अपेक्षित असले, तरी विकासकाने शुल्क न भरल्यास भविष्यात हा आर्थिक भार सोसायटीधारकांवर पडण्याची शक्यता असल्याने विकासकाकडूनच शुल्काची वेळेत वसुली करण्याची कायदेशीर व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराबाबतही फेडरेशनने प्रश्न उपस्थित केला आहे. अपेक्षित पुनर्वापर ५० टक्के असताना प्रत्यक्ष पुनर्वापर सुमारे ३० टक्के असल्यास ही तफावत का निर्माण झाली, याची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ५० टक्क्यांपेक्षा अधिक पुनर्वापर करणाऱ्या सोसायट्यांना शुल्कात सवलत देऊन पर्यावरणपूरक कामाला प्रोत्साहन द्यावे, अशी भूमिका फेडरेशनने घेतली आहे.

फेडरेशनने प्रस्तावाचा पुनर्विचार करून शुल्करचनेत स्पष्टता, विकासकाची जबाबदारी, नियमांचे पालन करणाऱ्या सोसायट्यांना प्रोत्साहन आणि शुल्कातून जमा होणाऱ्या निधीचा पारदर्शक वापर याबाबत स्पष्ट तरतुदी करण्याची मागणी केली आहे.

> "पर्यावरण संरक्षणाला आमचा विरोध नाही. STP व्यवस्थित चालले पाहिजेत आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर वाढलाच पाहिजे. मात्र पर्यावरणाच्या नावाखाली सोसायटीधारकांवर आर्थिक बोजा टाकणारे धोरण आम्हाला मान्य नाही. एकाच सेवेसाठी दुहेरी शुल्क आकारू नये, विकासकाची जबाबदारी सोसायटीवर ढकलू नये आणि नागरिकांकडून घेतलेल्या प्रत्येक रुपयाचा पारदर्शक हिशेब द्यावा. सदर विषय सध्याच्या स्वरूपात मंजूर करू नये; अन्यथा फेडरेशनच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल."
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

# पॉक्सो/पॉश कायद्यावर कार्यशाळा संपन्न

## विद्यार्थ्यांना कायद्याबाबत मार्गदर्शन; कायद्याची जाणीव, सुरक्षिततेचा संकल्प!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**रोटरी क्लब तळेगाव दाभाडे आणि नूतन अभियांत्रिकी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सुरेशभाई शहा हॉलमध्ये 'पॉश कायदा २०१३' (कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण) या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या सत्रात ॲड. शुभांगी परुळेकर यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.**





कार्यक्रमाची प्रास्ताविक भूमिका मांडताना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी अशा कायदेशीर मार्गदर्शन सत्रांची कार्यस्थळावरील उपयुक्तता अधोरेखित केली. त्यानंतर रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडेचे अध्यक्ष प्रमोद दाभाडे यांनी रोटरी क्लबच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

प्रमुख वक्त्या ॲड. शुभांगी परुळेकर यांनी दैनंदिन कामकाजात पॉश कायदा (POSH Act) समजून घेण्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, "कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि निकोप वातावरण तयार करण्यासाठी हा कायदा केवळ महिलांनीच नव्हे, तर पुरुषांनीही नीट समजून घेणे तितकेच आवश्यक आहे." त्यांनी कायद्यातील विविध तरतुदी आणि त्यासंबंधित प्रक्रिया सोप्या भाषेत समजावून सांगितल्या.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आभार प्रदर्शन अंतर्गत तक्रार समितीच्या (ICC) प्रमुख डॉ. नीता कराडकर यांनी केले. या कार्यक्रमास रोटरी क्लबचे सचिव चेतन नामजोशी, प्रकल्पप्रमुख ॲड. अभिषेक गोडांबे, सीएसआर डायरेक्टर गिरीश जोशी, रो. धनंजय मथुरे, फर्स्ट लेडी वैशाली दाभाडे यांच्यासह रोटरी क्लबचे अन्य सदस्य व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन घेतले.

# विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून कौशल्य विकासावर भर : NMIET कॉलेजचा संकल्प

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक पदवी न देता उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार कौशल्यविकास आणि प्रात्यक्षिक शिक्षण देण्यावर नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा (NMIET) मुख्य भर राहणार आहे, अशी माहिती संस्थेच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष राजेश म्हस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.**




> "आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पारंपारिक पदवी मिळवणे पुरेशी नसून उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य प्राप्त करणे ही काळाची गरज बनली आहे. NMIET मध्ये आमचा मुख्य भर हा विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांना व्यावहारिक आणि उद्योगाभिमुख शिक्षण देण्यावर आहे. आमच्या 'नूतन इनक्युबेशन सेंटर'च्या माध्यमातून नवोन्मेष, संशोधन आणि उद्योजकता प्रोत्साहन देऊन जागतिक दर्जाचे सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> - राजेश म्हस्के (अध्यक्ष, कार्यकारी समिती / NMIET)

पत्रकार परिषदेत बोलताना राजेश म्हस्के म्हणाले, "आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पदवी पुरेशी नसून उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य प्राप्त करणे ही काळाची गरज बनली आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, उद्योग आणि उद्योजकता यांचा एकत्रित विकास झाल्यास भविष्यातील सक्षम मनुष्यबळ निर्माण होईल. नूतन इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी, ग्रामीण युवक, औद्योगिक कर्मचारी व नवउद्योजकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे."

संस्थेचे संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाचा विस्तार, संशोधन, नवोपक्रम, पेटंट, कॉपीराइट, आंतरराष्ट्रीय परिषदा आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी भागीदारी या संकल्पनांवर प्रकाश टाकला. उद्योगांशी सहकार्य वाढवून संस्थेला जागतिक स्तरावर नेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी सीईओ डॉ. रामचंद्र जहागीरदार, प्रवेश प्रक्रिया व आऊटरिच प्रमुख डॉ. मिलिंद ओव्हाळ आणि प्रसिद्धी प्रमुख प्रीती धुले उपस्थित होते. डॉ. मिलिंद ओव्हाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# आधुनिक महाविद्यालयीन ग्रंथालये: डिजिटल युगातील ज्ञान, संशोधन आणि शैक्षणिक परिवर्तनाचे केंद्र



**महाविद्यालयीन ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संग्रहालय नसून ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोपक्रम आणि बौद्धिक विकासाचे केंद्र आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील शैक्षणिक संवाद अधिक प्रभावी करण्यामध्ये ग्रंथालयाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि डिजिटल शिक्षणावर भर देते. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आधुनिक ग्रंथालये शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनली आहेत.**

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे ग्रंथालयांचे स्वरूपही बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), ई-बुक्स, डिजिटल ग्रंथालये, मुक्त प्रवेश (Open Access), क्लाउड-आधारित सेवा, संस्थात्मक डिजिटल रिपॉझिटरी (Institutional Repository) आणि ऑनलाइन संशोधन डेटाबेस यांच्या साहाय्याने विद्यार्थी व शिक्षकांना जागतिक दर्जाची माहिती काही क्षणांत उपलब्ध होत आहे. Koha, D Space, NDLI, DELNET आणि INFLIBNET-यांसारख्या आधुनिक डिजिटल प्रणालींमुळे ज्ञानसंपत्तीचे प्रभावी व्यवस्थापन आणि प्रसार शक्य झाला आहे.

तथापि, डिजिटल साधनांच्या वाढत्या वापरामुळे काही आव्हानेही निर्माण झाली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे माहिती सहज उपलब्ध होत असली तरी चिकित्सक विचार, सखोल वाचन आणि स्वतंत्र विश्लेषण करण्याची प्रवृत्ती कमी होण्याची शक्यता आहे. सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होते आणि सातत्यपूर्ण वाचनाची सवय कमी होत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर आणि पारंपरिक वाचनसंस्कृती यांच्यात संतुलन राखणे आवश्यक आहे.

आजचे ग्रंथालय केवळ माहिती पुरवणारे केंद्र न राहता ज्ञान व्यवस्थापन (Knowledge Management), माहिती साक्षरता (Information Literacy), AI साक्षरता (AI Literacy), संशोधन कौशल्य, संदर्भ व्यवस्थापन आणि शैक्षणिक प्रामाणिकता (Academic Integrity) विकसित करणारे प्रशिक्षण केंद्र बनत आहे. विद्यार्थ्यांनी माहितीचा केवळ वापर न करता तिचे चिकित्सक मूल्यमापन करून नवज्ञाननिर्मितीत सहभाग घ्यावा, ही काळाची गरज आहे.

महाविद्यालयीन ग्रंथालयांनी वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी पुस्तक चर्चा, लेखक भेट, वाचन स्पर्धा, संशोधन कार्यशाळा, डिजिटल साक्षरता प्रशिक्षण, AI आधारित माहिती शोध कार्यशाळा आणि शिक्षक-विद्यार्थी संयुक्त संशोधन उपक्रम राबविणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, नवोपक्रम आणि आजीवन शिक्षणाची सवय विकसित होते. भविष्यातील ग्रंथालये ही स्मार्ट, डिजिटल आणि वापरकर्तेकेंद्रित असतील. आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक वाचनसंस्कृती यांचा समतोल साधणारी ग्रंथालयेच उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढवू शकतात. त्यामुळे ग्रंथालये ही केवळ माहितीची केंद्रे नसून ज्ञान, संशोधन, नवोपक्रम आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाची प्रेरणास्थाने आहेत. डिजिटल युगात आधुनिक ग्रंथालये ही शैक्षणिक परिवर्तनाची प्रभावी वाहक म्हणून उदयास येत असून, विद्यार्थी, शिक्षक आणि समाज यांच्या बौद्धिक प्रगतीसाठी त्यांचे योगदान अधिकाधिक महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**लेखक परिचय**
**डॉ. राहुल बाराथे**
**ग्रंथपाल व जनसपंर्क अधीकार एम.आय.टी. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी पुणे**

# राजीव गांधी अक्षय ऊर्जा दिनानिमित्त जनजागृती अभियान

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**आकुर्डी स्थित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे येथे राजीव गांधी अक्षय ऊर्जा दिनानिमित्त “अक्षय ऊर्जा जनजागृती अभियान” आयोजित करण्यात आले होते. या अभियानाचे आयोजन सोलारस्क्वेअर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने करण्यात आले.**



या अभियानाचा मुख्य उद्देश विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सौर ऊर्जा, अक्षय ऊर्जा, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांविषयी जनजागृती निर्माण करणे हा होता. यावेळी सौर ऊर्जेच्या वापराबाबत माहिती, आधुनिक सौर तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक तसेच विविध ज्ञानवर्धक व संवादात्मक उपक्रम आणि मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सोलारस्क्वेअर एनर्जी प्रा. लि. चे विक्री संचालक, सोनू कुमार यांनी उपस्थितांना अपारंपारिक ऊर्जेचे महत्त्व, सौरऊर्जेचा वापर, ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धन याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी सोलारस्क्वेअर एनर्जी प्रा. लि. चे रुग्वेद ऐनापुरे, ओमदीप मलाकार, सुशांत काळे आणि सचिन गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले.

या उपक्रमामुळे पर्यावरणपूरक आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांविषयी जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली असून, भविष्यातील ऊर्जा संवर्धनासाठी सकारात्मक दृष्टीकोन विकसित झाल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी नमूद केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संकुल संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांनी आयोजकांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

या अक्षय ऊर्जा जनजागृती अभियानाचे नियोजन डॉ. शिल्पा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. अनिकेत गरुड, प्रा. डॉ. सोनाली महापरळे, प्रा. डॉ भाग्यश्री वरुडे, कल्याणी सहारे यांनी केले तर सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी दीक्षा पांडे हिने केले.